# दि नंदुरबार मर्चन्टस् को-ऑप. बँक लि.,नंदुरबार

१०३०, कन्हैया स्मृती, घी बाजार, नंदुरबार - ४२५४१२ दूरध्वनी : ०२५६४ - २२३०६४ / २२१७२७

२८ वा वार्षिक अहवाल सन २०२२-२०२३

रजि.नं.: डीएलई/बीएनके(ओ)/ १०१/९४-९५/दि.२८-९-९४


## वार्षिक साधारण सभेचा अजेंडा

### फक्त सभासदांसाठी

दि नंदुरबार मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., नंदुरबारच्या मा. सभासदांची **२८ वी वार्षिक साधारण सभा दि.०९/०९/२०२३ शनिवार रोजी दुपारी ४ वाजता स्व. कन्हैयालाल रावजीभाई व्यापारी भुवन, मार्केट यार्ड, नंदुरबार** येथे बँकेचे संस्थापक अध्यक्ष **मा. श्री. किशोरभाई कन्हैयालाल वाणी** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनीमय करणेसाठी आयोजित केलेली आहे. तरी कृपया सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

### सभे पुढील विषय

१. मागील सभा दि. २८-०८-२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.
२. मा. संचालक मंडळाने अहवाल वर्षात केलेल्या कामकाजांचा आढावा घेणे.
३. दि. ३१-०३-२०२३ अखेरच्या आर्थिक पत्रकांना मंजुरी देणे.
४. सन २०२२-२०२३ च्या शासकिय तपासणी व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षासाठी अंदाज पत्रक मंजुर करणे.
६. बाहेरील कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे.
७. सन २०२२-२०२३ मध्ये अंदाजापेक्षा कमी/जास्त झालेल्या खर्च/उत्पन्नास मान्यता देणे.
८. मा. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२२-२०२३ च्या नफावाटणीस मान्यता देणे.
९. बँकेचे सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षासाठी मा. रिझर्व्ह बँकेच्या परवानगीस अधीन राहून वैधानिक लेखा परिक्षक यांची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
१०. दि. २८-०८-२०२२ व आजच्या वार्षिक सभेला अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीला मान्यता देणे.
११. मा. अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने आयत्यावेळी येणारे विषय.

**श्री. कन्हैयालाल तुकाराम पाटील**
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि नंदुरबार मर्चन्ट्स को-ऑप. बँक लि.,नंदुरबार

नंदुरबार
दिनांक : १८-०८-२०२३

### सभासदांना महत्वाच्या सुचना

१. गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने होईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्व साधारण सभेस काही प्रश्न उपस्थित करावयाचे असल्यास कृपया दि. ०१/०९/२०२३ पर्यंत बँकेत लेखी स्वरुपात कळवावे.
३. सभासदांनी वार्षिक साधारण सभेचा अहवाल जवळच्या शाखेतून घेऊन जावे, ही विनंती.
४. बँकेचे ३१ मार्च २०२३ अखेरचे नफा तोटा पत्रक व ताळेबंद बँकेचे मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्ड वर लावले आहे.
५. सभासदांनी त्यांचे इ मेल आय. डी. व मोबाईल नं. बँकेस कळवावे. त्यात बदल झाला असल्यास ते देखील कळवावे.
६. सभासदांची केवायसी पूर्तता राहिली असल्यास लवकरात लवकर पूर्ण करावी.

प्रति, बुक-पोस्ट

श्री / श्रीमती ------------------------------------------

मु.--------------- पो.--------------- ता.जि.नंदुरबार-४२५४१२

पोस्ट तिकीट


द्वारा :
**दि नंदुरबार मर्चन्ट्स को-ऑप. बँक लि.,नंदुरबार**
१०३०, कन्हैया स्मृती, घी बाजार, नंदुरबार - ४२५४१२
दूरध्वनी : ०२५६४ - २२३०६४ / २२१७२७



बँकेमार्फत मोबाईल बँकिंग सेवा सुरु झाली आहे.

**सर्व शाखेत ATM सुविधा उपलब्ध**

**NET NPA : 0 %**

**CRAR : 21.38 %**

**सर्व शाखेत RTGS, NEFT, लॉकर्स सुविधा उपलब्ध**

## सन्माननीय सभासद व ठेवीदार यांच्यासाठी हितगुज

१. आपल्या बँकेच्या नंदुरबार, निजामपुर, प्रकाशा, तळोदा, शहादा शाखा व विस्तार कक्ष सिंधी कॉलनी नंदुरबार येथुन बँकिंग सेवेचा लाभ घ्या. सर्व व्यवहार शक्यतो एकाच बँकेतुन करण्याचा प्रयत्न करा.

२. आपला पत्र व्यवहाराचा पत्ता बदलला असल्यास कृपया नवीन पत्ता त्वरीत मुख्य कार्यालयास व आपल्या जवळच्या शाखेस लेखी पाठवावे. म्हणजे सदर नोंद बँकेच्या दप्तरी करण्यात येईल.

३. बॅकेंमार्फत मोबाईल बँकिंग सेवा व ATM सेवा उपलब्ध असून सर्व ग्राहकांनी या सेवेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या शाखेत संपर्क साधावा.

४. आता सीटीएस क्लिअरींग सिस्टीम असल्याने आवश्यक बॅलेन्स खात्यावर असणे बंधनकारक आहे.

५. सर्व खातेदारांनी के.वाय.सी. नियमाप्रमाणे खातेदारांचे अद्ययावत रंगीत फोटो, पॅन कार्ड, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, सध्या राहण्याचे ठिकाण, पत्ता पुरावा म्हणून देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना खात्यामध्ये व्यवहार करता येणार नाही.

६. सर्व कर्जदारांनी कर्जाची वेळेवर परतफेड करणे, कर्जदारांच्या व बँकेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. नियमित कर्ज परतफेडीमुळे / विलंबामुळे ग्राहकाचे क्रेडीट इन्फर्मेशन कंपनीकडे (CIBIL) सर्व नोंदी होत असतात. आपली स्वत:ची पत निर्माण करण्यासाठी आता आपण स्वत: जबाबदार आहोत.

७. ग्राहकाला त्यांच्या बचत व चालू खात्यात नियमित व्यवहार करावे लागतात. अन्यथा त्यांचे बचत खाते निष्क्रिय (Inoperative) होते आणि ठराविक कालावधीत सुप्त (Dormant) होते व सदर रक्कम ही रिझर्व्ह बँकेत वर्ग होते.

८. सर्व शाखांमध्ये लॉकर्स उपलब्ध आहेत. बँकेचा लॉकर्स सुविधेचा लाभ घ्या.

९. आपल्या ठेव खात्यावर वारसाचे नांव (Nominee) नोंदविले नसल्यास त्याची नोंद करणे गरजेचे आहे.

१०. बँकेच्या कामांबाबत काहीही अडचणी असल्यास बँक प्रशासनाकडे संपर्क साधावा.

**बँकेकडे आजच संपर्क करुन बँकेकडे असलेले आपले अनक्लेम डिपोझिट (DEA) Fund परत न्या.**

## ● बँकेची दि.३१ मार्च २०२३ अखेरची सांपत्तीक परीस्थिती व प्रगतीचा आलेख ●

(रु. लाखवात)

| तपशिल | सन २०-२१ | सन २१-२२ | सन २२-२३ |
|---|---|---|---|
| वसुल भागभांडवल | ४४२.५४ | ४७१.९४ | ४८४.५६ |
| स्व निधी | १९७२.३७ | २०८८.४३ | २२६२.१५ |
| ठेवी | १३८६१.९४ | १४१९३.०३ | १३११९.४९ |
| सभासदांना कर्ज वाटप | ८०४३.९४ | ८६४२.४५ | ८९२१.६५ |
| निव्वळ नफा | १४६.६६ | २०१.४५ | १७४.४० |
| गुंतवणूक | १४३२.७० | १४००.२० | ११००.०० |
| शास.रोख्यातील गुंतवणूक | ५३४४.९६ | ४६४८.९२ | ४५४७.२६ |
| मालमत्ता व फर्निचर | १७८.७२ | १७४.५० | १६४.०८ |
| खेळते भांडवल | १६६९७.७६ | १७३४७.२६ | १६४७३.७२ |
| प्रति कर्मचारी व्यवसाय | ४५६.३७ | ५०९.८२ | ४७९.१६ |

| तपशिल | सन २०-२१ | सन २१-२२ | सन २२-२३ |
|---|---|---|---|
| एकूण मिळालेले व्याज | १४६७.२९ | १३४१.७७ | १३८२.४५ |
| एकूण दिलेले व्याज | ८०१.७२ | ५५९.०७ | ६६२.७३ |
| एकूण उत्पन्न | १६०५.९० | १४४७.०१ | १४५८.०४ |
| सी.आर.ए.आर. | २१.९२ % | २०.२१ % | २१.३८ % |
| ग्रॉस एन.पी.ए. | ५.७४ % | ६.०५ % | ५.७० % |
| नेट एन.पी.ए. | ०.०० % | ०.०० % | ०.०० % |
| डिव्हीडंड दर | १२% | १२% | १२%(प्रस्तावित) |
| शाखांची संख्या | ५+१ विस्तार कक्ष | ५+१ विस्तार कक्ष | ५+१ विस्तार कक्ष |
| ऑडीट वर्ग | 'अ' | 'अ' | 'अ' |

## ● कर्जावरील व्याज दर - दि. १/१/२०२३ पासुन ●

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | व्याज दर |
|---|---|---|
| १. | घर तारण कर्ज (नवीन बांधकाम) | ९.००% |
| २. | कार लोन | १०.००% |
| ३. | नजरगहाण कर्ज (HYP) व सोने तारण कर्ज | १०.५०% |
| ४. | वेअर हाऊस कर्ज / टर्म लोन (प्रोफेशनल) | ११.००% |
| ५. | घर तारण (कमर्शिअल) | ११.००% |
| ६. | टू व्हिलर, कमर्शिअल वाहन, शैक्षणिक कर्ज | ११.५०% |
| ७. | वस्तु खरेदी कर्ज | १२.००% |
| ८. | सिक्युर्ड कॅश क्रेडीट, वर्किंग कॅपिटल टर्म लोन | १२.५०% |
| ९. | पगारदार नोकरांसाठी कर्ज | १३.५०% |
| १०. | क्लिन कॅश क्रेडीट व जामिनकी कर्ज | १५.००% |

## ● ठेवीवरील व्याज दर - दि. १२/१/२०२३ पासुन ●

| अ.क्र. | ठेवीचा कालावधी | व्याज दर | ज्येष्ठ नागरिक |
|---|---|---|---|
| १. | ३० दिवस ते ४५ दिवस | ४.२५ % | ४.४० % |
| २. | ४६ दिवस ते ९० दिवस | ५.०० % | ५.२५ % |
| ३. | ९१ दिवस ते १८० दिवस | ५.२५ % | ५.५० % |
| ४. | १८१ दिवस ते ३६५ दिवस | ६.०० % | ६.२५ % |
| ५. | १ वर्षाचे वर ते २ वर्षापर्यंत | ७.१० % | ७.४० % |
| ६. | २ वर्षाचे वर ते ५ वर्षापर्यंत | ७.१५ % | ७.५० % |
| ७. | दामदुप्पट | ११८ महिने | ११६ महिने |